

**शेत शिवार सल्ला**

**डॉ. प्रशांत बोडके**
संचालक,
संशोधन मफुकृवि, राहुरी

# हवामान अंदाज व कृषी सल्ला

दि. २९ ते ३१ ऑक्टोबर दरम्यानच्या कालावधीसाठी शेतकरी बांधवांसाठी खालीलप्रमाणे हवामान आधारीत कृषी सल्ला जारी केला आहे. या काळात आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. दि. ३० व ३१ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी विजेच्या कडकडाटासह अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## पशुधन व्यवस्थापन

-जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व मुबलक पाण्याची सोय करावी आणि पिण्याचे हौद आठवड्यातून एकदा नियमितपणे स्वच्छ करावेत.

-चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची कुटी करून गव्हाणीतून द्यावी. कमी प्रतीचा चारा चांगल्या प्रतीच्या चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात मिसळून दिल्यास त्याचा परिणामकारक वापर होतो.

# ही कामे त्वरित करा

**कापूस वेचणी व व्यवस्थापन :** पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने दुसरी व तिसरी वेचणी करावी. वेचणी केलेला कापूस सुरक्षित ठिकाणी साठवावा.

**तूर (शेंगा भरण्याची अवस्था) :** वांझ रोग: प्रादुर्भाव दिसताच रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.

**फायटोफथोरा करपा :** झाडांच्या खोडावर चट्टे दिसल्यास रोगग्रस्त झाडे उपटून टाकावीत आणि योग्य बुरशीनाशकाची आळवणी करावी.

**हरभरा पेरणी :** बागायती हरभऱ्याची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. सुचवलेले वाण: विजय, विशाल, दिग्विजय, फुले विक्रम, फुले विक्रांत आणि फुले विश्वराज.

**रब्बी मका पेरणी :** जमिनीत पुरेसा ओलावा असताना १० नोव्हेंबरपर्यंत पेरणी करावी.

**कांदा लागवड :** रांगडा कांदा लागवड ऑक्टोबर अखेरपूर्वी पूर्ण करावी.

**करडई पेरणी :** ऑक्टोबर अखेरपर्यंत पेरणी पूर्ण करावी.



